# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ २९५

दिनांक :- 23 JAN 2019

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानीत व विना अनुदानीत अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र/व्यवस्थापन शास्त्र/

वास्तुशास्त्र पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:- नवीन Apprenticeship Act च्या अमंलबजावणीबाबत करावयाची कार्यवाही.

**संदर्भ** :-१) उच्च व तंत्रशिक्षण ,महाराष्ट शासन, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१४९/विशि-२, दि. २७/१२/२०१८

२) मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/ॲप्रेंटीस ॲक्ट/ २०१८/२३, दि.०९-०१-२०१९

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ (२०१८ चा १७) पारीत केला आहे. सदर अधिनियमाची दि.०५-०४-२०१८ पासून राज्यात अमंलबजावणी करण्यात येत आहे. अप्रशिक्षीत उमेदवार (Fresher)/औद्योगिक संस्था उत्तीर्ण उमेदवार /महाराष्ट्र व्यवसाय परिक्षा मंडळ एम.ई.एस प्रशिक्षित /सेक्टर स्कील कौन्सील/बी.ए./बी.कॉम उत्तीर्ण उमेदवार यांना शिकाऊ उमेदवारांची संख्या वाढून प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून उेमेदवारांच्या कौशल्यात वाढ होऊन त्याचा उपयोग रोजगार/ स्वयंरोजगाराकरिता होईल असे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

त्यानुसार मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव मा. श्री. प्रविण परदेशी यांचे अध्यक्षतेखाली दि. २९-१०-२०१८ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. सदर आढावा बैठकीमध्ये काही सुचना देण्यात आल्या त्यानुषंगाने पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अभियांत्रिकी पदविका व पदवीचे शिक्षण घेत असतांना दुस-या/तिस-या/चौथ्या वर्षी (Eentership)/मध्ये किंवा उन्हाळी सुटटी /दिवाळी सुटटी यामध्ये अर्धवेळ व पुर्णवेळ याप्रमाणे उमेदवारांना प्रत्यक्ष इंडस्ट्रीजमध्ये शिकाऊ उमेदवारी देता येईल व त्यासाठी प्रयत्न करावेत.

महाराष्ट्र शासनाचे सन २०२० पर्यंत ५.०० लाख उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्याचे उद्दिष्ट असल्याने, राज्य शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाला सन २०१८, २०१९ व २०२० पर्यंत अनुक्रमे ०.५ लाख, १.५ लाख व २.५ लाख इतक्या महाविद्यालयीन व तंत्रनिकेतनामधील उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन दिले आहे. सदर उद्दिष्टांची पूर्तता करण्याकरीता अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनामधील उमेदवारांना Demand Driven Skill training द्यावे तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील अधिका-यांशी समन्वये ठेवून त्याअनुषंगीक कार्यवाही करण्यात यावी व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबतः वरीलप्रमाणे.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईवर अपलोड करण्यासाठी.

RAM/dte and other sr office

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail: desk2@dtemaharashtra.gov.in web - www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- २/एनजीसी/अॅप्रेंटीस अॅक्ट/२०१८/23
दिनांक:- 9 JAN 2019

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती, नागपूर.

विषय :- नविन Apprenticeship Act च्या अंमलबजावणीबाबत करावयाची कार्यवाही.
संदर्भ :-१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१०/एटीएस/२०१८/प्र.क्र.२/३११ दि.१.१२.२०१८
२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४१३/तांशि-४, दि.५.१२.२०१८
३. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४९/विशि-२, दि.२७.१२.२०१८

महाराष्ट्र शासनाने शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ (२०१८ चा १७) पारीत केला आहे. सदर अधिनियमाची दि.५.०४.२०१८ पासुन राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या शिकाऊ उमेदवारीच्या नियमावलीनुसार सद्य स्थितीत शिकाऊ उमेदवारी भरतीचे प्रमाण आस्थापनेवरील एकुण मनुष्य बळाच्या (कंत्राटी कामगारांसह) २.५ % ते १०% इतके आहे. तथापि राज्यात उद्योग क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचा शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाकरीता प्रभावीपणे उपयोग करणे शक्य असल्याने, ट्रेड अॅप्रेंटीसचे प्रमाण २५% पर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे अप्रशिक्षीत उमेदवार (Fresher)/ औद्योगिक संस्था उत्तीर्ण उमेदवार / महाराष्ट्र व्यवसाय परिक्षा मंडळ / एम.ई.एस प्रशिक्षित /सेक्टर स्कील कौन्सील /बी.ए. /बी.कॉम उत्तीर्ण उमेदवार यांना शिकाऊ उमेदवारी प्राप्त होवून शिकाऊ उमेदवारांची संख्या वाढून प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून उमेदवारांच्या कौशल्यात वाढ होवून त्याचा उपयोग रोजगार / स्वयंरोजगाराकरीता होईल असे निर्देश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

त्यास अनुसरुन मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव मा.श्री. प्रविण परदेशी यांचे अध्यक्षतेखाली दि.२९.१०.२०१८ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. सदर आढावा बैठकीमध्ये काही सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सुचनांच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयांच्या स्तरावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

- उद्योजक व मोठ्या औद्योगिक संघटनेचे व स्थानिक संघटनेचे प्रतिनिधी तंत्रशिक्षण विभागाचे अधिकारी, अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांमधील अधिकारी, विद्यापीठाचे प्रतिनिधी, औद्योगिक सुरक्षा संचालनालयाचे प्रतिनिधी, प्रादेशिक स्तरावरील कामगार खात्याचे अधिकारी यांच्या उपस्थितीत आणि रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास विभागाचे अधिकारी यांचे समन्वयाने प्रादेशिक स्तरावर आयोजित करण्यात येणा-या बैठकीस व्यक्तीश: उपस्थिती रहावे.
- प्रादेशिक स्तरावर संपन्न होणा-या बैठकीमध्ये शिकाऊ उमेदवारी योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तयार केलेला कृती आराखड्यानुसार अंमलबजावणीबाबत रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास विभागाचे अधिकारी यांचेशी संपर्क साधण्यात यावा.
- औद्योगिक आस्थापनांना कोणत्या शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांची गरज आहे, याची अगोदर माहिती घेवून संबंधित अर्हताधारकांना कोणत्या इंडस्ट्रीज शिकाऊ उमेदवारी देवू शकतात याबाबतची माहिती संकलीत करण्यात यावी.
- अभियांत्रिकी पदविका व पदवीचे शिक्षण घेत असताना दुस-या /तिस-या / चौथ्या वर्षी, Enternship मध्ये किंवा उन्हाळी सुट्टी / दिवाळी सुट्टी यामध्ये अर्धवेळ व पुर्णवेळ याप्रमाणे उमेदवारांना प्रत्यक्ष इंडस्ट्रीजमध्ये शिकाऊ उमेदवारी देता येईल व त्यासाठी प्रयत्न करावेत.
- आय.टी.आय. उत्तीर्ण उमेदवारांचे शिकाऊ उमेदवारी मिळवून दिली जाते, त्याच धर्तीवर जिल्हा व विभाग स्तरावर तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील उमेदवारांचे भरती मेळावे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार उद्योजकता अधिकारी आणि अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनांमधील प्लेसमेंट अधिकारी यांनी संयुक्तपणे घ्यावेत.
- औद्योगिक आस्थापनांना कोणत्या शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांची गरज आहे, याची अगोदर माहिती घेवून संबंधित अर्हताधारकांना कोणत्या इंडस्ट्रीज शिकाऊ उमेदवारी देवू शकतात यांचा समन्वय साधून रोजगार मेळावे आयोजित करावेत. जेणेकरून शिकाऊ उमेदवारी मिळाली नाही म्हणून उमेदवार निराश होवून परत जाणार नाहीत.
- महाराष्ट्र शासनाचे सन २०२० पर्यंत ५.०० लाख उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्याचे उद्दीष्ट असल्याने, राज्य शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाला सन २०१८, २०१९ व २०२० पर्यंत अनुक्रमे ०.५ लाख, १.५ लाख व २.५ लाख इतक्या महाविद्यालयीन व तंत्रनिकेतनांमधील उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी मिळवून देण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करून दिले आहे. सदर उद्दिष्टाची पूर्तता करण्याकरीता

अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनांमधील उमेदवारांना Demand Driven Skill training द्यावे तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील अधिका-यांशी समन्वय ठेवून त्याअनुषंगीक कार्यवाही करण्यात यावी.

- सोबत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तयार केलेला कृती आराखडा जोडला आहे.

शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ (२०१८ चा १७) ची राज्यामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता निर्देशित केल्यानूसार तंत्रशिक्षण विभागीय स्तरावर कार्यवाही करण्यात यावी. अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत :

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरीता सादर.
२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरीता.
३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
४. कार्यासन अधिकारी, का.क्र.१० व १६ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

**महाराष्ट्र राज्य**

प्र. क्र. :- संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४९/विशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
ई- मेल: amol.bhokare@nic.in
दिनांक:- २७ डिसेंबर, २०१८.

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

**विषय** :- विद्यापीठस्तरावरुन शिकाऊ उमेदवारी योजना राबविण्याबाबत.
**संदर्भ** :-संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि.१९.१२.२०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

केंद्र शासनाच्या शिकाऊ उमेदवारीच्या नियमावलीनुसार शिकाऊ उमेदवारी भरतीचे प्रमाण आस्थापनेवरील एकूण मनुष्यबळाच्या २.५०% ते १०% इतके आहे. तथापि, राज्यात मोठया प्रमाणात पायाभूत सुविधांचा शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणाकरीता प्रभावीपणे उपयोग करणे शक्य असल्याने शिकाऊ उमेदवारी भरतीचे प्रमाण १५% पर्यंत वाढविण्यात आले आहे. विविध शाखेमध्ये उत्तीर्ण झालेले उमेदवार यांना शिकाऊ उमेदवारी प्राप्त झाल्यामुळे शिकाऊ उमेदवारींनी त्यांच्या कामाच्या अनुभवातून उमेदवाराचा कौशल्यात वाढ होऊन त्याचा उपयोग रोजगार व स्वयंरोजगाराकरीता होईल, असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले आहेत.

२. सद्यस्थितीत ITI उत्तीर्ण उमेदवारांना मोठया प्रमाणात शिकाऊ उमेदवारी प्राप्त होते त्याच धर्तीवर B.A., B.Com., B.Sc., अभियांत्रिकी पदवी व पदविका यांचे शिक्षण घेत असलेल्या दुसऱ्या /तिसऱ्या/ चौथ्या वर्षीचे Internship किंवा उन्हाळी सुट्टी किंवा दिवाळी सुट्टी मध्ये अर्धवेळ किंवा पुर्णवेळ याप्रमाणे उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी देता येईल.

३. ITI उत्तीर्ण उमेदवारांचे शिकाऊ उमेदवारांसाठी भरती मेळावे घेण्यात येतात त्याच धर्तीवर जिल्हा व विभागस्तरावर तसेच सर्व महाविद्यालयांमध्ये उमेदवाराचे भरती मेळावे संयुक्तपणे घेण्यात यावेत. शिकाऊ उमेदवारी योजना काय आहे, ही योजना कशी राबावयाची, त्याचे नियम व मर्यादा काय आहेत, या योजनेचे फायदे काय आहेत इ.ची पूर्णपणे माहिती मिळावी याकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे प्रादेशिक सहसंचालक तसेच विद्यापीठाचे संबंधित अधिकारी, प्लेसमेंट ऑफिसर्स, उद्योग आस्थापनाचे प्रमुख पदाधिकारी, उद्योग असोसिएशनचे पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य व प्लेसमेंट अधिकारी यांच्या उपस्थितीत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण

28/12

संचालनालयाचे प्रादेशिक सहसंचालक सादरीकरण आयोजित करतील. शिकाऊ उमदेवारीमध्ये सेक्टरनिहाय जे व्यवसाय निर्देशित आहेत ते सोडून ज्या नवीन व्यवसायाची शिकाऊ उमेदवारांना गरज लागणार आहे, त्यांचा पध्दतशीर अभ्यासक्रम तयार करून त्यास राज्य शिकाऊ उमेदवारी परिषद यांच्याकडून अधिसूचना काढून त्या अभ्यासक्रमानुसार शिकाऊ उमेदवाराची विविध आस्थापनात भरती करणे व विहित प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषदेमार्फत त्यांची परिक्षा व उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र देणे अशाप्रकारे शिकाऊ उमेदवारीचा उपक्रम राबविण्यात यावा. याकरिता व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने कृती आराखडा तयार केला असून सदर कृती आराखडा सर्व अकृषी विद्यापीठ तसेच सदर विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच सोबतच्या कृती आराखडानुसार प्रत्येक टप्पानिहाय झालेल्या कार्यवाहीचा अहवाल उदा. कार्यशाळा घेणे, कार्यशाळेची उपस्थिती, सादरीकरण व त्याबाबतच्या शंका निरसन इत्यादीची माहिती, कार्यशाळेनंतर गठीत करावयाचा समित्या, समितीने केलेली कामे इत्यादीबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करण्यात यावा.

सोबत :- संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तयार केलेला कृती आराखडा.

आपला,

(नि. शं. क्षीरसागर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नागपूर.

## पदवी धारकांसाठी विद्यापीठ स्तरावर शिकाऊ उमेदवारी योजना राबविणे.

## कृती आराखडा

| अ.क्र. | कामाचे स्वरुप व टप्पे | कामाची जबाबदारी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ स्तरावर कार्यशाळा आयोजित करणे.<br>कार्यशाळेत आवश्यक उपस्थिती-<br>प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक, प्रादेशिक कार्यालयाचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार तसेच विभागिय सहसंचालक तंत्र शिक्षण व त्यांचे प्लेसमेंट ऑफिसर, उद्योग आस्थापनांचे प्रमुख, उद्योग असोसिएशनचे पदाधिकारी, महाविद्यालयांचे प्राचार्य व त्यांचे प्लेसमेंट ऑफिसर यांनी उपस्थित रहाणेबाबत सर्व कुलसचिवांना पत्र देणे. | संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई. | डिसेंबर २०१८, तिसरा आठवडा. |
| २ | प्रत्येक विद्यापीठ स्तरावर कार्यशाळा आयोजित करणे. वरीलप्रमाणे सर्वांना निमंत्रित करुन कार्यशाळेचे आयोजन करणे | सर्व विद्यापीठाचे कुलसचिव. | डिसेंबर - २०१८, चौथा आठवडा / जानेवारी-२०१९, पहिला आठवडा. |
| ३. | विद्यापीठातील कार्यशाळेत शिकाऊ उमेदवारी योजना, अधिनियम, सुधारणा, व्यवसाय अभ्यासक्रम व अंमलबजावणी याबाबत सादरीकरण करणे. | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक तथा सहप्रशिक्षणार्थी सल्लागार. | डिसेंबर - २०१८, चौथा आठवडा / जानेवारी-२०१९, पहिला आठवडा. |
| ४. | विद्यापीठ स्तरावर कुलसचिवांच्या अध्यक्षतेखाली पदवीधारक उमेदवारांसाठी शिकाऊ उमेदवारी समिती गठीत करणे.<br>अध्यक्ष : कुलसचिव.<br>सदस्य सचिव:<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक<br>सदस्य : उद्योग असोसिएशनचे प्रतिनिधी<br>: CII, FICCI, विदर्भ इंडस्ट्रि असोसिएशन, मराठवाडा इंडस्ट्रि असोसिएशन<br>: उपसंचालक, रोजगार स्वयंरोजगार व कौशल्य विकास.<br>: महाविद्यालयांचे प्राचार्य (निवडक) | संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई. | जानेवारी - २०१९, दुसरा व तिसरा आठवडा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | : Training & Placement Officer.<br>: सेक्टरनिहाय उद्योग असोसिएशनचे प्रतिनिधी<br>समितीची कार्य व कर्तव्य :<br>१. उद्योग आस्थापनांची गरज लक्षात घेवून शिकाऊ उमेदवारीचे व्यवसाय निश्चीत करणे.<br>२. निश्चीत केलेल्या नविन व्यवसायांचे अभ्यासक्रम तयार करणे.<br>३. राज्य शिकाऊ उमेदवारी परीषद यांना अभ्यासक्रम मंजुरीसाठी प्रस्तावित करणे.<br>४. उद्योग आस्थापनांना निर्देशित व्यवसाय अभ्यासक्रमांबाबत अवगत करणे.<br>५. भरती मेळावे आयोजित करणे.<br>६. उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी मिळणेसाठी संनियंत्रण करणे | | |
| ५. | विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रम तयार करण्यासाठी इंडस्ट्रिज सेक्टरनिहाय उपसमिती स्थापन करणे.<br>अध्यक्ष : कुलसचिव.<br>सदस्य सचिव : प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक / प्रतिनिधी<br>सदस्य : १. विद्यापीठाचे बोर्ड ऑफ स्टडीजचे चेअरमन.<br>२. महाविद्यालयांचे प्राचार्य.<br>३. Training & Placement Officer.<br>४. उद्योग सेक्टरचे प्रतिनिधी<br>५. अभ्यासक्रमाचे तज्ज्ञ शिक्षक / प्राध्यापक | विद्यापीठाचे कुलसचिव. | जानेवारी - २०१९, तिसरा आठवडा. |
| ६. | सेक्टरनिहाय उद्योग आस्थापनांशी चर्चा करुन निश्चित केलेल्या नविन व्यवसायाचे अभ्यासक्रम तयार करणे व प्रमुख समितीस सादर करणे. | विद्यापीठाचे कुलसचिव व सहसंचालक प्रादेशिक कार्यालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण. | जानेवारी - २०१९, चौथा आठवडा व फेब्रुवारी - २०१९ पहिला आठवडा. |
| ७. | विद्यापीठ समितीने प्रस्तावित केलेल्या नविन व्यवसाय अभ्यासक्रम प्रस्तावित करणे. | विद्यापीठाचे कुलसचिव व सहसंचालक प्रादेशिक कार्यालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण. | फेब्रुवारी - २०१९ तिसरा आठवडा. |
| ८. | राज्य शिकाऊ उमेदवारी परीषदेकडुन प्रस्तावित नविन निर्देशित व्यवसायांची मंजुरी घेणे. | संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई. | फेब्रुवारी - २०१९ चौथा आठवडा. |

| | | | |
|---|---|---|---|
| . | राज्य शिकाऊ उमेदवारी परीषदेने, SAC ने निर्देशित केलेल्या अभ्यासक्रमांची अधिसुचना निर्गमित करणे. | सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग. | मार्च - २०१९ दुसरा व तिसरा आठवडा. |
| ०. | विद्यापीठ शिकाऊ उमेदवार समितीने पदवीधर उमेदवारांकरीता सेक्टरनिहाय भरती मेळावे आयोजित करणे. | विद्यापीठाचे / कॉलेजचे ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट ऑफिसर. | फेब्रुवारी - २०१९ चौथा आठवडा व मार्च - २०१९ पहिला आठवडा. |
| ११. | भरती केलेल्या उमेदवारांचे ऑफलाईन मोड मध्ये भरती करुन संविदा नोंदणी करणे व अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे. | संबंधित औद्योगिक आस्थापना. | मार्च - २०१९ पहिला व दुसरा आठवडा पासुन फेब्रुवारी - २०२० पर्यंत |
| १२. | प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांची परीक्षा घेणे व उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र देणे. | राज्य व्यवसाय प्रशिक्षण परीषद (SCVT) | फेब्रुवारी / मार्च - २०२० |